म. ग्रं. सं. ठाणें

विषय

संग्रहालय क्रमांक ६५

लेखक रामचंद्र त्र्यंबक पटवर्धन

पुस्तकाचें नांव मराठीतील शुद्धलेखनाच्या नियमांचे टिपण

सन १८८८.

२७

रा. क्र. ६५

मराठीतील शुद्धलेखनाच्या नियमांचे टिपण.

(भा. व.

१८८८
म. ग्रं. मं. ठाणें
विषय भाषा व्याकरण
सं. नं. ८५

…ील शुद्ध लेखनाच्या …नियमांचें टिप्पण

———000———

हें

असिस्टंट मास्तर चंद्र त्र्यंबक पटवर्धन,

ह्यांनीं विद्यार्थ्यांच्या मजी जिजीभाई हाय स्कूल ठाणें …च्या उपयोगाकरितां केलें.

अरुणोदयाच्या मालकानें.

ठेवून …ली मालकी ठेवून

ठाणे येथें

अरुणोदय छापखान्यांत छापिलें.

आवृत्ति १ ली.

सन १८८८ इसवी.

किंमत एक आणा.

(सन १८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणें नोंदून सर्व हक्क राखले आहेत.)

७८८८
म. ग्रं. सं. ठाणें
विषय भाषा व्याकरण
सं. नं. ९५

[illegible]ल शुद्ध लेखनाच्या
नियमांचें टिप्पण

—— ooo ——

हें

रामचंद्र त्र्यंबक पटवर्धन,
असिस्टंट मास्तर बैरामजी जिजीभाई हाय स्कूल ठाणें

ह्यांनीं विद्यार्थ्यांच्या उपयोगाकरितां केलें.

तें

अरुणोदयाच्या मालकांनीं आपली मालकी ठेवून

ठाणें येथें

अरुणोदय छापखान्यांत छापिलें.

आवृत्ति २ री.

सन १८८८ इसवी.

किंमत एक आणा.

(सन १८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणें नोंदून सर्व हक्क राखले आहेत.)

मराठी ग्रंथ संग्रहालय
नं०

पहिल्या आवृत्तीची प्रस्तावना

——ooo——

जरी आपल्या भाषेंत शुद्धलेखनाच्या संबंधानें बरींच पुस्तकें झालीं आहेत, तथापि त्यांत नियम थोडे नसून पुन: जसे ते व्यापक असावे तसे नाहींत; ह्यामुळें मुलांस व्हावी तशी मदत होत नाहीं; म्हणून मराठी भाषा बालबोध लिपींत शुद्ध रीतीनें लिहिण्याच्या नियमांचें हें टिप्पण केलें आहे. हे नियम हल्लीं सुधारलेल्या व चालू असलेल्या मराठी भाषेस अनुसरून असल्यामुळें कोठें कोठें मतभेद होण्याचा संभव आहे. असो, हे नियम शिकण्याच्या पूर्वीं विद्यार्थ्यांनीं व्याकरणाचें ज्ञान चांगल्या रीतीनें करून घेतलें पाहिजे. हें पुस्तक सर्वांस उपयोगी पडावें म्हणून त्याची किंमत फारच थोडी ठेविली आहे.

ह्या पुस्तकांत तीन गोष्टींचा विचार केला आहे:—अनुस्वारांविषयीं, ह्रस्वदीर्घांविषयीं, आणि विरामचिह्नांविषयीं.

इंग्रजी भाषेंतील वर्णवटिकेप्रमाणेंच आपल्या भाषेंत हें अनुस्वारांचें थोतांड कसें माजलें आहे हें समजत नाहीं; कित्येक ठिकाणीं तर अनुस्वारांचा उच्चार देखील होत नाहीं. तरी ह्या अनुस्वारांविषयीं फार भानगडी व मतभेद आहेत, म्हणून त्याविषयीं प्रथम विचार केला आहे. ह्रस्वदी-

यांविषयीं फारसा घोटाळा नाहीं, ज्या शब्दाचा जसा उच्चार होतो, त्याप्रमाणेंच लिहिण्याचा प्रघात आहे. आतां इतर भाषांतील जे शब्द आपल्या भाषेंत आहेत ते जशाचे तसेच लिहिले पाहिजेत. त्यांच्या ह्रस्वदीर्घांविषयीं नियम देण्याचें कारण नाहीं. विरामचिह्नें हा शुद्धलेखनाचाच एक भाग आहे; म्हणून त्यांचाही थोडासा विचार केला आहे.

ठाणें, ता० ६ जानेवारी
सन १८८३ इसवी.

रा० त्र्यं० पटवर्धन.

दुसऱ्या आवृत्तीची प्रस्तावना.

———000———

अव्ययांविषयीं सर्व साधारण नियम आजपर्यंत कोणत्याही शुद्धलेखनाच्या पुस्तकांत (ह्या पुस्तकाची पहिली आवृत्ति शिवायकरून) दिलेले नाहींत. पहिल्या आवृत्तींत नियम व्यापक असून थोडे असावे असा प्रयत्न केल्यामुळें पुस्तक बरेंच कठीण झालें, असें पुष्कळ मराठी शाळांतील शिक्षकांनीं मला सांगितल्यावरून सुलभ होण्याकरितां कित्येक ठिकाणीं एकेका नियमाचे दोन दोन व क्वचित् तीन तीनही

नियम ह्या आवृत्तींत केले आहेत. उदाहरणार्थ, पहिल्या आवृत्तींतील दुसऱ्या नियमांत नपुंसकलिंगी शब्द, विभक्तिप्रत्यय आणि अव्ययें ह्या सर्वांस लागू पडणारा एकच नियम होता, त्याचे ह्या आवृत्तींत तीन नियम केले आहेत.

नियमांखालीं विशेष माहितीसाठीं मधून मधून टिपा दिल्या आहेत.

मराठी भाषा ही संस्कृत भाषेपासून झाली आहे, त्यामुळें ह्या भाषेंत पुष्कळच संस्कृत शब्द येतात. त्यांच्या शुद्धलेखनाविषयीं, पहिल्या आवृत्तींत कांहींच नियम नसल्याकारणानें शुद्धलेखनास पुष्कळ अडचण पडे. ही उणीव दुसऱ्या आवृत्तींत काढून टाकण्याविषयीं आमचे मित्र रा० रा० जनार्दन बाळाजी मोडक, बी०ए० हेड् मास्तर् हाय् स्कूल् ठाणें ह्यांनीं सूचना केली, (त्याबद्दल मी त्यांचा फार आभारी आहें,) त्यावरहुकूम दुसऱ्या प्रकरणांत दोन भाग केले आहेत. पहिल्या भागांत **शुद्ध मराठी** भाषेंतील शब्दांच्या इ आणि उ ह्या वर्णांच्या ह्रस्वदीर्घांविषयीं विचार केला आहे; ह्यांतच परभाषांतील शब्दांच्या इ आणि उ ह्यांच्या ह्रस्वदीर्घांविषयीं थोडेंसें सांगितलें आहे. दुसऱ्या भागांत मराठी भाषेंत येणाऱ्या संस्कृत शब्दांच्या इ, उ, ऋ आणि ऌ ह्या वर्णांच्या ह्रस्वदीर्घांविषयीं साधारण नियम देण्याचा प्रयत्न केला आहे. संस्कृतासारख्या अतिगहन व गंभीर भाषेंतील शब्दांच्या इ, उ, वगैरे वर्णांच्या ह्रस्वदीर्घां-

विषयीं नियम बांधण्याचा प्रयत्न करणें म्हणजे महानदीच्या जलौघाला वाळूचा बांध घालण्यासारखें होय. तथापि हा यत्न कितपत सिद्धीस गेला आहे, हें वाचकांवर सोंपवितों. लहान विद्यार्थ्यांस संस्कृत भाषेची माहिती थोडी असते, म्हणून प्रत्येक प्रसंगीं होतील तितकीं निरनिराळीं उदाहरणें दिलीं आहेत. तेवढीं उदाहरणें जरी त्यांनीं ध्यानांत ठेविलीं तरी त्यांचें या भाषेंतील शब्दांच्या ह्रस्वदीर्घांविषयीं शुद्धलेखनाच्या संबंधानें अर्धें काम होईल; मग नियम पाठ करण्याची देखील गरज नाहीं. ह्या आवृत्तींत आणखी एक चवथें प्रकरण नवीन घातलें आहे, त्यांत ह्या विषयाच्या संबंधानें कांहीं किरकोळ गोष्टींविषयीं लेखनांत ज्या चुका होतात त्यांविषयीं थोडेंसें सांगितलें आहे.

पहिल्या आवृत्तींत अनुस्वार प्रकरणाच्या शेवटीं पुष्कळ सानुस्वार शब्दांची याद दिली होती त्यांतील बरेच शब्दांच्या अक्षरावर अनुस्वार कां येतो ह्याविषयीं थोडेंसें दिग्दर्शन ह्या आवृत्तींत केलें आहे. एकंदरींत हें पुस्तक सर्वांस उपयुक्त होण्यास जितकी तजवीज करवेल तितकी केली आहे. हें म्हणणें किती सयुक्तिक आहे, तें सोबत असलेल्या शाळाखात्यांतील मुख्य मुख्य अधिकाऱ्यांच्या अभिप्रायावरून, आणि मराठी ट्रान्सलेटर इ० डी० ह्यांच्या ह्या पुस्तकाच्या ह्या आवृत्तीच्या हस्तलिखित प्रतीवर झालेल्या रिपोर्टांतील

(मे० डा०आफ् प०इ० यांचे प्रेसिडेन्सी ह्यांच्या हुकुमावरून) घेतलेल्या उताऱ्यांवरून सहज लक्ष्यांत येईल.

शेवटीं इतकें सांगणें जरूर आहे कीं, मे०डा० आ०प० इ० वऱ्हाड ह्यांस हें पुस्तक पसंत पडून त्यांनीं बक्षिसाच्या पुस्तकांच्या यादींत हें नमूद केलें आहे.

ठाणें ता० ११ सप्तेंबर
सन १८८७ इसवी.

रा० त्र्यं० पटवर्धन.

Thánd, 27*th August* 1886.

Dear Mr. Patvardhan,

I have gone through the Ms copy of the 2nd edition of your tractate on Marathi Orthography and am glad to say that it will be of great use to students in vernacular schools and in the Lower classes of the Anglo-vernacular Schools. I also notice that you have carried out in this edition the suggestions I made to you on the perusal of the first edition by inserting rules on the correct way of writing Sanskrit and foreign words that are to be met with in Marathi Literature.

Yours sincerely.

(sd.) *J. B. Modak*,

Head Master B. J. High School Thana.

Thana, 30*th July* 1886.

Dear sir,

I read the whole of the manuscript of your rules for Marathi Orthography and I have no hesitation in saying that with the alterations and additions suggested, the book will, when printed, be a useful addition to our school-room literature.

Believe me to be

Dear Sir,

Yours very Sincerely

(sd.) *K. N. Sáne*,

Deputy Edl. Inspector Thana sub-division.

Nassik, 28th May 1886.

I have carefully gone through the pamphlet containing rules for Marathi dictation, composed by Mr. R. T. Patvardhan, assistant Master, Byramji Jijibhoy High school, Thana. This collection of rules though not a necessity in vernacular schools, in districts like Poona, Ratnagiri &c., will be in my opinion of immense use both to the pupil and the teacher in vernacular schools in the Ahmadnagar, Nassik and Khandesh districts. If vernacular school-masters in the North-East-Division be permitted to use the pamphlet in their schools, I am confident, that results in the vernacular schools under second and third heads of standards III, IV V and VI will be far better than what are obtained at present without the introduction of any such pamphlet.

(sd.) *G. V. Limaye*,
Deputy Edl. Inspector Nassik Sub-Division.

Nasik, 20th Sep: 1886.

I fully concur with Mr. Limaye in his opinion and consider that the publication of rules of dictation would be a valuable addition to the existing stock of works on Marathi Orthography

(sd.) *B. R. Sahasrabudhe*,
Ag. Edl. Inspector N. E. D.

Extracts from the Report of the Marathi Translator E. D.

"There are five printed books sent with the Ms. by Mr. Patvardhan one of which is the first edition of his book published in 1883. + + + + + + On a comparison of all the books I find that Mr. Patvardhan has attempted to give general rules instead of particular rules distributed over a whole book. Mr. Rowji shastri has remarked, and I too find, that Mr. Patvardhan has studied the subject with considerable care and that he is well acquainted with Marathi & Sanskrit. Mr. Patvardhan's manuscript has passed through several hands and under several eyes, and + + it is reviewed by men who best know the wants of school boys."

\+ + + +

(sd.) *N. B. Godbole.*

Acting Marathi Translator E. D., & Secretary to the Dakshina prize committee.

श्री

मराठी भाषेंतील शुद्ध लेखनाविषयीं सामान्य विचार.

——000——

प्रकरण पहिलें.

अनुस्वाराविषयीं.

(लिहितांना प्रत्येक शब्द थोडयाशा अंतरानें दूर दूर लिहावा.)

१. शब्द उच्चारतांना ज्या अक्षरावर अनुस्वाराचा स्पष्ट उच्चार होत असेल, त्याच अक्षरावर तो शब्द लिहितांना अनुस्वार द्यावा; जसें— चांगला आंबा, उंच भिंत, इत्यादि.

२. संस्कृत शब्द असल्यास, ज्या अक्षरावर अनुस्वार आहे त्या अक्षरापुढील व्यंजन ज्या वर्गातील असेल त्या वर्गाचा अनुनासिक वर्ण पाहिजे तर त्या व्यंजनास पूर्वी जोडावा, अगर अनुस्वार कायम ठेवावा; जसें—अंक, अङ्क; अंजन, अञ्जन; घंटा, घण्टा; दंत, दन्त; बिंब, बिम्ब; इत्यादि.

'य' पासून पुढच्या बाकी राहिलेल्या व्यंजनापैकीं एखादें व्यंजन अनुस्वारापुढें असल्यास अनुस्वारच कायम

ठेवावा; जसें—संयोग, संवाद, संरक्षण, संलग्न; संशय, दंष्ट्रा, संसार; संहार, (संक्षोभ), (संज्ञा); इ०.

३ सविभक्तिक शब्दांपैकीं, म्हणजे नाम, सर्वनाम, विशेषण आणि क्रियापद ह्यांपैकीं, नपुंसकलिंगी शब्द (मग ते एकवचनीं असोत अथवा बहुवचनीं असोत) ह्यांचें अंत्याक्षर जर ईकारान्त, ऊकारान्त किंवा एकारान्त असलें, तर त्याजवर अनुस्वार द्यावा; जसें—मोतीं, केळीं, गाणीं, लिहिणीं, बांसरूं, पांखरूं, तळें, घरें, करणें, बोलणें; इ० नामें; हीं—तीं (मुलें), जें (फूल) इ० सर्वनामें; पाढरीं (धोतरें), तांबडें (पागोटें) इ० विशेषणें; (त्यास मीं वस्त्रें) दिलीं, (त्यानें पुस्तक विकत) घेतलें, (दारें) उघडलीं, (झाड) वाढलें, (तिनें) जावें, (त्यानें त्यास) मारिलें, इ० क्रियापदें.

अपवाद—(अ). पाणी, लोणी, किती, तट्टू, पाहिजे, व पुरे ह्या शब्दांच्या अंत्याक्षरावर अनुस्वार देऊं नये.

(ब) लिंगभेदेंकरून ज्या विशेषणांचीं रूपें बदलत नाहींत, तीं नपुंसकलिंगी असलीं तरी त्यांच्या अंत्याक्षरावर अनुस्वार देऊं नये; जसें—उद्योगी पुरुष, उद्योगी स्त्रिया, उद्योगी मुलें; कडू (भोपळा, काकडी, कारलें), वगैरे (लोक, हवेल्या, कामें); इ०.

सूचना—तूं, कांहीं व नाहीं (हे शब्द नपुंसकलिंगी नसले तरी) ह्यांजवर नेहमीं अनुस्वार येतो.

टीप–आकारान्त नपुंसकलिंगी शब्द मराठी भाषेंत नाहींत. असते तर अव्ययांप्रमाणें त्यांच्या अन्त्याक्षरावर अनुस्वार आला असता.

४. **अविभक्तिक** शब्दांचें, म्हणजे क्रियाविशेषण, उभयान्वयी, शब्दयोगी आणि केवळप्रयोगी **अव्ययें** ह्यांचें अन्त्याक्षर जर **आकारान्त, ईकारान्त, ऊकारान्त** अथवा एकारान्त असलें, तर त्याजवर अनुस्वार द्यावा; जसें–असतां, आतां, जेव्हां, केव्हां, हल्लीं, देऊं, कोठें, एथें, तेथें; इ० क्रियाविशेषणें; कीं, कांकीं, इ० उभयान्वयी अव्ययें; पेक्षां, साठीं, मुळें, इ० शब्दयोगी अव्ययें; हां, हूं, इ० केवळप्रयोगी अव्ययें.

अपवाद–पंदा, गुदस्ता, तिगस्ता, [[1]बहुधा, सदा, सर्वदा, तदा, यदा, कदा,] जरा, हळू, कडे, [व कडे हा शब्द लागून झालेलीं सर्व अव्ययें; जसें–एकीकडे, अलीकडे, इकडे, तिकडे, इ०] हीं क्रियाविशेषण अव्ययें; [[1]वा, अथवा, किंवा]; आणखी, जरी, तरी, म्हणजे; हीं उभयान्वयी अव्ययें; ही, ना, हीं शुद्धशब्दयोगी अव्ययें; आणि अगा, जी, अरे, इ० संबोधनवाचक; व वाहवा, छी, थू, भले, इ० उद्गारवाचक केवळप्रयोगी अव्ययें; इतरयांच्या अंत्याक्षरावर अनुस्वार देऊं नये.

टीप–अव्ययें वस्तुत: नपुंसकलिंगी शब्द आहेत, परंतु जेव्हां कांहीं क्रियाविशेषणांस लिंगादि कार्यें होतात, तेव्हां त्यांत जीं नपुंसकलिंगी असतील त्यांजवरच अनुस्वार द्यावा, जसें–उभे, उभ्या, उभीं राहतात; इ०.

---

१ हे [कौंसांत असलेले] शब्द संस्कृत भाषेंतील आहेत.

५ विभक्तिप्रत्यय हे वस्तुतः शब्दयोगी अव्ययें आहेत म्हणून त्यांपैकीं जे आकारान्त, ईकारान्त, अथवा एकारान्त असतील त्यांजवर अनुस्वार द्यावा; जसें–आं [घरां], शीं [भिंतीशीं], नें [बाणानें]; इ०.

अपवाद–ला, ना, [नी[1]] ह्या विभक्तिप्रत्ययांवर अनुस्वार देत नाहींत.

टीप – (अ) बाणेंकरून, येणेंप्रमाणें असल्या शब्दांत 'करून' व 'प्रमाणें' हीं शब्दयोगी अव्ययें जोडिलीं असतांही मागील शब्दांचा तृतीयेचा प्रत्यय कायम राहतो, म्हणून 'णे' वर अनुस्वार येतो.

टीप–(ब) ऊकारान्त विभक्तिप्रत्यय असते तर अव्ययांप्रमाणें त्यांच्या अंत्याक्षरावर अनुस्वार आला असता.

सूचना–वरील नियम [५ वा] विशेषेंकरून तृतीया व सप्तमी ह्या विभक्तींच्या प्रत्ययांस लागू पडतो.

६. षष्ठीचा संबंध नपुंसकलिंगी शब्दाकडे असला तर मात्र षष्ठीच्या प्रत्ययावर अनुस्वार द्यावा, जसें–हरीचें [पुस्तक], गोविंदाचीं [घरें]; इ०.

परंतु षष्ठयन्त सामान्यरूप झालें असतां त्याजवर अनुस्वार देऊं नये; जसें विष्णूचे [चित्रास] गोपाळाच्या [झाडास].

---

१ हें उदाहरण देण्याची जरूर नाहीं, कारण ओकारान्ता-विषयीं नियमांत उल्लेख नाहीं; परंतु विभक्तिप्रत्यय असल्या-मुळें अनुस्वाराविषयीं संशय येईल म्हणून दिलें आहे.

टीप—एकारान्त सामान्यरूप न करितां यकारसहित आकारान्त करण्याची वहिवाट पडेल तर बरें होईल; कारण मग अनुस्वाराविषयीं संशय येणार नाहीं.

७. बहुवचनी शब्दास विभक्तिप्रत्यय किंवा शब्दयोगी अव्यय **जोडिलें असतां मात्र** त्याच्या सामान्यरूपावर अनुस्वार द्यावा; एरवीं सामान्यरूपावर **कधींही अनुस्वार देऊं** नये; जसें—त्या काळ्या पांच घोड्यांस, तिघांविषयीं; इ०.

टीप—वरील 'त्या' ह्या सर्वनामाच्या व 'काळ्या' ह्या विशेषणाच्या सामान्यरूपावर, पुढें विभक्तिप्रत्यय किंवा शब्दयोगी अव्यय जोडिलें नाहीं, म्हणून अनुस्वार नाहीं; परंतु कवितेंत वगैरे जेव्हां प्रत्ययाभाव विभक्ति येते म्हणजे विभक्तिप्रत्ययांचा लोप होऊन द्वितीयादि विभक्ति फक्त सामान्यरूप होऊनच होतात, तेव्हां बहुवचनी शब्द असल्यास सामान्यरूपावर अनुस्वार येतो, जसें—'उचलति नढळे जें अन्य देवां मनुष्यां' 'देखोनि डोळां हृदयाभिरामा;' नेत्रां वाटे इ०.

८. शब्दास सप्तमीचा 'त' हा प्रत्यय, किंवा 'आंतून' हें शब्दयोगी अव्यय लागलें असतां तो शब्द **एकवचनी असला** तरी त्याच्या सामान्यरूपावर अनुस्वार द्यावा, जसें—(एका) खोलींत, (दुसऱ्या) भिंडाडांतून, इ०.

तसेंच (आं) तील व (आं—) तला—ली—लें—ले—ल्या—लीं हे शब्द लागून साधलेलीं विशेषणें ह्यांच्याही सामान्यरूपावर अनुस्वार द्यावा; जसें—बागेंतील—तला, ली—लें, ले—ल्या—लीं; इ०.

टीप—'त' हा प्रत्यय आंत (अन्तः) ह्या शब्दापासून निघाला आहे, म्हणून मूळचा अनुस्वार, हा प्रत्यय शब्दास लागला असतां त्याच्या सामान्यरूपावर कायम राहतो.

९. मी, आम्ही, तुम्ही व कोणी ह्या शब्दांवर तृतीया विभक्ति असतांना मात्र अन्तीं अनुस्वार द्यावा; जसें—कोणीं असें विचारिलें कीं; हें काम कोणीं केलें? मीं, आम्हीं, तुम्हीं केलें; परंतु कोणी असें म्हणतात कीं, मी हें काम करीन, आम्ही करूं, तुम्ही कराल; इ०.

टीप—'मी' व 'तूं' ह्या शब्दांचीं तृतीयेचीं 'म्यां' व 'त्वां' अशींही रूपें होतात व त्यांवर अनुस्वार असतो. परंतु हीं रूपें हल्लीं बहुधा कवितेंत मात्र आढळतात.

१०. लाखों, हजारों, शेंकडों, हे शब्द आणि शें (१००) हा शब्द लागून झालेलीं **संख्याविशेषणें** ह्यांच्या अन्त्याक्षरावर नेहमीं अनुस्वार येतो; जसें दोनशें लोक, इ०.

११. **प्रथम पुरुषीं** क्रियापद असतांना त्याचा अन्त अकार **नसेल** तर त्याच्यावर अनुस्वार द्यावा; जसें—मी बसलों आहें, आम्ही उद्यां शाळेंत जाऊं, जणों (=आम्ही समजतों), (मी) युद्ध न **करीं**, धरीना शस्त्रातें, इ०.

अपवाद—लिंगभेदेंकरून क्रियापदाचें रूप फिरलें असतांना क्वचित् अनुस्वार येत नाहीं; जसें—मी असावी (कर्तरि प्रयोग विध्यर्थ), मी आकर्षिली गेल्यें [कर्मणि प्रयोग] इ०.

१२. **स्वार्थी**, बहुवचनीं द्वितीयपुरुषीं आकारान्त क्रियापदाच्या अन्त्याक्षरावर अनुस्वार द्यावा; जसें—तुम्ही लिहितां, बसलां; इ०.

टीप—अरे विद्यार्थ्यांनो उठा, येथें आज्ञार्थ म्हणून 'ठा' वर अनुस्वार नाहीं,

१३. क्रियापदास आज्ञार्थी ई किंवा ए हे प्रत्यय अन्तीं मुद्दाम लाविले असतां त्यांजवर अनुस्वार द्यावा; जसें--'येइं[1] येइं मदारी जगन्नाथा,' 'भिडे रणधुरंधरा०.' 'मायां वसें नसें दूर' (मोरोपंत) ; इ०.

टीप - असलीं बनविलेलीं ईकारान्त व एकारान्त आज्ञार्थी क्रियापदें कवितेंत येतात म्हणून गद्यांत येणाऱ्या ये, ने, दे इ० आज्ञार्थी एकारान्त क्रियापदांवर अनुस्वार देऊं नये.

१४ आज्ञार्थी व विध्यर्थी क्रियापदाचें अकारणरूप झालें असतां, मूळचा धातु ऊकारान्त होऊन त्यांजवर अनुस्वार असतो; जसे-जा-जाऊं नको, द्यावा-देऊं नये; इ०.

टीप-धातूस केव्हांही ऊ प्रत्यय लागला म्हणजे त्यांजवर नेहमीं अनुस्वार येतो.

१५. आहे, नये, नलगे, नव्हे (नको[2]) व रीतिभूतकाळीं क्रियापदें हीं नपुंसकलिंगी असलीं तरी त्यांच्या अन्त्याक्षरावर अनुस्वार देऊं नये; जसें हें मूल खेळत आहे, तुला दुःख होता कामा नये, मला शत्रुत्व नलगे, तें घर पूर्वी फार ओलसर असे., इ०.

टीप- कवितेंत रीतिभूतकाळासारखीं एकारान्त (तिन्ही काळीं) व ईकारान्त क्रियापदांचीं रूपें होतात म्हणून तीं नपुंसकलिंगी असलीं तरी त्यांच्या अन्त्याक्षरावर अनुस्वार देत नाहीत; जसें-'घडेना हें मिथ्या,' (भ०) 'तों दिसे वदन०(भ०), 'ज्याच्या क्रिये सकल पद्मभवांड वाने' (व०), इ० एकारान्त; महापुरें झाडें जाती, इ०; ईकारान्त.

---

१. प्रकरण दुसरें भाग १ ला नियम ११ सूचना पहा.
२. नियम ५ वा–अपवाद–ह्यांतील 'ना' वरील १ २ पहा.

सूचना–परंतु प्रथमपुरुषीं हीं क्रियापदें असतांना मात्र त्यांच्या अन्त्याक्षरावर अनुस्वार येतो. जसें–[मी] युद्ध न करीं, धरीं· ना शस्त्रातें कदनसमयीं मी निजकरीं; इ०.

१६. जातांना, करितांना इत्यादि वर्तमानकालवाचक धातु· साधित अव्ययांच्या 'ता' वरच अनुस्वार द्यावा, 'ना'वर देऊं नये.

१७. जे कांहीं शब्द संस्कृत शब्दांपासून निघालेले आहेत त्यांचा मूळचा अनुस्वार कायम राहतो, परंतु त्याचा स्पष्ट उच्चार होत नाहीं; जसें–

चोंच [चंचु],	गांठ [ग्रंथि],	कांटा [कंटक],
दांत [दंत],	वां–टा–टणें [वंटक],	घांट [घण्टा],
आंत [अंतर्],	पांच [पंच],	सांखळी [शृंखला],
तांत [तंतु],	आंखणें [अंकन],	कांपणें [कंपन],
सांचणें [संचय],	वांसा [वंश],	डांस [दंश],
इ०.	इ०.	इ०.

१८. मूळ संस्कृत शब्दांत 'म' हें अक्षर असलें तर याचें मराठींत बहुधा 'व' हें अक्षर होतें व पूर्वीच्या अक्षरावर अनुस्वार येतो; जसें–

गांव [ग्राम],	नांव [नाम],	हींव–हिंवाळा [हिम]
सांवळा [श्यामल],	कोंवळें [कोमल],	गहूं [गोधूम],
जांवई [जामातृ],	आंवळा [आमलक]	आंव [आम],
ओंवळें (अमंगल = ओंगळ),	शींव [सीमा],	शेंवरी [शाल्मली],
सोंवळें [सुमंगल],	इ०.	इ०.

१९. कांहीं संस्कृत शब्दांत जीं संयुक्त व्यंजनें असतात त्यांच्याबद्दल मराठींत एकच व्यंजन येऊन पूर्वीच्या अक्षरावर बहुधा अनुस्वार येतो, व कित्येक ठिकाणीं त्याचा स्पष्ट उच्चार होतो, जसें—

उंच [उच्च],	उंट [उष्ट्र],	कुंचा [कूर्च],
आंबा [आम्र],	भिंत [भित्ति],	मांजर [मार्जार],
कांसव [कच्छप],	ओंठ [ओष्ठ],	वांकडा [वक्र],
घांस [ग्रास],	घांसणें [घर्षण],	कांतणें [कर्तन],
हांसणें [हास्य],	कांख [कक्षा],	पांख [पक्ष],
पांखरूं [पक्षी],	वांसरूं [वत्स],	आंसवें [अश्रु],
आंख [अक्ष],	ऊंस (इक्षु),	झोंप (स्वाप),
इ०.	इ०.	इ०.

२०. कित्येक संस्कृतशब्दांतील शकाराचा मराठींत सकार होतो व सकाराचा शकार होतो व पूर्वीच्या अक्षरावर अनुस्वार येतो; जसें—केंस [केश] फांस [पाश] शींव [सीमा] इ०.

२१. कांहीं शब्दांवर अर्थभेदेंकरून अनुस्वार येतो, जसें—

नाव (नौका), नांव (संज्ञा)	काकी (नाग), कांकीं (अ०)
पाच (झाड), पांच (संख्या)	काकू (चुलती), कांकू (मागें घेणें)
आस (आशा), आंस (आंख)	जव (धान्य), जंव (जोंपर्यंत)
ताट (जेवणाचें), तांट (ओरूचें)	तव (तुझें), तंव (तोंपर्यंत)
घाट (डोंगरीघाट) घांट (घंटा)	काच (जाच), कांच (भिंग)
विषयीं (विशेषण) विषयीं (अ०)	मास (महिना), मांस (मांसकुंड)

वाचणें (पुस्तक वगैरे)	वांचणें (जिवंत असणें)
वाटणें (भासणें)	वांटणें (विभागणें)
कापणें (चिरणें)	कांपणें (हलणें)
टाक (खालीं फेंक)	टांक (लोखंडी लेखणी, एक वजन पावशेराचा अठरावा हिस्सा)
शीव (स्पर्शकर, दोराभर)	शींव (सीमा)
परवा (गरज)	परवां (आजपासून मागचा किंवा पुढचा तिसरा दिवस)

२२. कित्येक शब्दांवर केवळ रूढीनें अनुस्वार येतो ते शब्द येणेंप्रमाणें;—

नामें.

लोंकर	कोंपर—रा	भोंवरा	भोंवई [भुंवई]	डोंगर
खोंकड	टोंक	भोंकर	झोंक	झोंपडी
रोंख	ओंवा	घोंटाळा	भोंपळा	कोंकण
झोंपाळा [चोफाळा]		मोंगल	भोंसले	टांचणी
आंखणी	फंसणी	घांसणी	चांचणी	टांकळा
देंठ	पेंव	पेंन	रेंस	फेंस
ऊंस (इक्षु)	ठेंचा	कांच	आंच	टांच
फांक	खांच	फांटा	सांठा	चोंथा
कांकडी	लांकूड	ढेंकूण	शेंपूट	टेंकाड
टेंकडी	दंव	दहिंवर	संवय	भरंवसा
गंवडी	गंवसणी	कोंव	घोंट	खोंद
इ०	इ०	इ०	इ०	इ०

विशेषणें.

आंखूड चिंबट रांठ रांकट वेंथट पिंव-ळट-ळा कोंता इ०.

क्रियापदें.

धांवणें	सांपडणें	टांचणें	झांकणें	डांचणें	हांकणें
चांचपणें	चेंचणें	ठेंचणें	टेंकणें	फेंकणें	चेंपणें
खेंकणें	खेंकाळणें	रोंवणें	खोंवणें	खोंचणें	सोंपणें
पोहोंचणें	भोंसकणें	डंवचणें	गांवणें	गोंवणें	भोंवणें
इ०	इ०	इ०	इ०	इ०	इ०

अव्ययें.

जेंव	तेंव	जैं	तैं	जों	तों
पावेतों	कैंचा	चोहोंकडे	सभोंवतीं	वांचून	पैं
इ०	इ०	इ०	इ०	इ०	इ०

टीप – या वरील शब्दांपैकीं कित्येकांवर अनुस्वार कोणी देत नाहीं.

२३. कोरीव, घोटीव, घडीव इत्यादि शब्दांमध्यें उपान्त्य अक्षरावर अनुस्वार वैकल्पिक आहे.

२४. उपयोगी, नपुंसकलिंगी, स्वार्थी, इत्यादि कांहीं ईकारान्त शब्दांस विशेषणें मानल्यास अनुस्वार नको, परंतु सप्तम्यन्त शब्द मानले तर अनुस्वार दिला पाहिजे; याबद्दल साधारण नियम असा असावा कीं, नामाच्या पूर्वी आल्यास त्यांस विशेषण मानावें व नंतर आल्यास नाम मानावें.

२५. पुनः व स्वतः हे शब्द कोणी पुन्हां व स्वतां असे सानुनासिकही लिहितात.

प्रकरण दुसरें–भाग पहिला.

शुद्ध मराठीभाषेंतील शब्दांच्या इ, उ ह्या वर्णांच्या हृस्वदीर्घांविषयीं.

१. सर्व शब्दांच्या म्हणजे नाम, सर्वनाम, विशेषण, क्रियापद आणि चारही प्रकारचीं अव्ययें ह्यांच्या अन्त्याक्षरीं जे इकार व उकार असतील ते दीर्घ असतात; जसे–काठी, केवढी, आळशी, आली, हल्लीं, आणखी, लागीं, अगाई, इत्यादि ईकारान्त; लिंबू, तूं, मऊ, [आम्ही] करूं; हळू, थू; इत्यादि ऊकारान्त.

अपवाद–[१] आणि, परि (=परंतु, कवितेंत हें रूप येतें).

[२] इत्यादि [इति+आदि] किंतु, परंतु, व 'अपि' हे अव्यय लागून झालेले शब्द, जसें–अद्यापि, तथापि; इ०. हे शब्द संस्कृत भाषेंत हृस्व आहेत म्हणून मराठींतही हृस्व लिहितात.

२. शब्दांस विभक्तिप्रत्यय अथवा शब्दयोगीअव्यय जोडिलें असतांही त्यांचे अन्त्य इकार व उकार दीर्घच राहतात; जसें–पाटी–पाटीस, चाकू–चाकूनें; सुटी–सुटी-मध्यें, पेरू–पेरूवर; इ०.

टीप–शब्दाचें सामान्यरूप झालें म्हणजे त्यास दीर्घत्व येतें, मग त्या शब्दाचा कोणताही कां अन्त असेना; जसें–चीक,–चिकाला, पाठ–पाठीस, चिंच–चिंचेंत, भिंत–भिंतीचा; इ०.

३. मी, तूं, ती, ही, जी, (स्त्रीलिंगी) ह्या एकाक्षरी सर्वनामांचे अन्त्य इकार व उकार हे विभक्तिप्रत्यय लाविले असतां ह्रस्व होतात; जसें—मी—मला, तूं—तुझा, ती—तिचें, ही—हिचा, जी—जिची; परंतु स, तें, हून आणि त हे प्रत्यय अपवादक आहेत; जसें—तीस, तीतें, तीहून, व तींत.

टीप—मी, तूं, तो, हा; व जो [तिन्ही लिंगीं] ह्या सर्वनामांचीं सामान्यरूपें मज, तुज, त्याज, ह्याज, ज्याज, तिज, हिज, जिज, अशीं ह्रस्वान्त व माझ्या, तुझ्या, त्याच्या, हिच्या अशीं षष्ठ्यन्तही होतात; जसें—मजहून, तुझ्याहून, त्याजला, इजला (हिजला), ज्याच्यामध्यें; इ०.

४. धी, ऊ, पू, रू, इ० एकाक्षरी शब्दांस विभक्तिप्रत्यय अथवा शब्दयोगी जोडिलें असतां त्यांचे अन्त्य इकार व उकार ह्यांस इय आणि उव असे आदेश (म्हणजे ते इकार व उकार जाऊन याच्याबद्दल इय आणि उव हे येतात) अनुक्रमें होतात; जसें—धियास, रुवास—रुवाप्रमाणें; इ०.

५. प्रत्यय लागून झालेल्या साधित शब्दांचे, व समासांतील शब्दांचे मूळचे अन्त्य इकार व उकार दीर्घच राहतात; जसें—कांहीं—सें, चांगली—शी, गाडी—वान, दारू—बाज, इ० तसेंच विटी—दांडू, कारू—नारू; इ०.

६. अन्त्य अक्षर ह्रस्व असलें तर, उपान्त्य अक्षराचे, (म्हणजे शेवटल्या अक्षराच्या मागच्या अक्षराचे) जे इकार व उकार असतील ते दीर्घ असतात; जसें—मीठ, बारीक, कितीक, लिहीत, करीत, जाईल, येईन; खचीत, आणीक.

परीस [=पेक्षां], चीप; इ०; तूप, खरपूस, ऊठ, खेळून–दूर, म्हणून, पासून, चूप; इ०.

अपवाद–अधिक, चमत्कारिक; अमुक, बहुत, पिरपिर कुरकुर; इ० अनुकरणवाचक शब्द, (परंतु हे शब्द कोणी 'पिरपीर, कुरकूर' असेही लिहितात).

टीप–मराठीभाषेंत अन्त्य इकार व उकार दीर्घ असतात म्हणून अकारशिवाय अंतीं ह्रस्व अक्षर येत नाहीं, सबब अकारान्त शब्दांच्या उपान्त्याक्षराचे इकार व उकार दीर्घ असतात, हें वरील उदाहरणांवरून स्पष्ट दिसून येईल.

७. शब्दांच्या उपान्त्य अक्षरावर अनुस्वार असून त्याचा स्पष्ट उच्चार होत असेल तर त्या उपान्त्य अक्षरीं जे इकार व उकार असतील ते ह्रस्व लिहितात; जसें–दिंडी, कुंडी, खिंड, सुंठ, चिंच, तुंडुंब, जिंक, फुंक; इ०.

८. शब्दाचें अन्त्याक्षर संयुक्त अथवा दीर्घ असलें, किंवा झालें तर उपान्त्य अक्षराचे इकार व उकार ह्रस्व असतात, किंवा होतात; जसें–भित्रा, करितां, गंजीफ–गंजिफा; कुत्रा, पाहुणा, फूल–फुलें; इ०.

अपवाद–रेफाच्या मागचे उपान्त्य अक्षराचे इकार व उकार दीर्घ असतात, जसें–कीर्द, ऊर्फ, तूर्त, पूर्वी; इ०.

९. अकारान्त शब्दाच्या उपान्त्य अक्षराचे दीर्घ इकार व उकार हे विभक्तिप्रत्यय अथवा शब्दयोगीअव्यय जोडिलें असता ह्रस्व होतात; जसें–तीर, तिरास–मूळ–मु

ठीस; वहीण—वहिणीचा; खजा—खजाळा; [illegible]ट—पि[illegible]चा [पाटाचा]; चुल्हड—चुल्हडास [चुर[illegible]

अपवाद—मूळचें, दूरचा, इ० एथें [illegible] आहेत, ह्यांची षष्ठी विभक्ति 'मुळाचें' अशी होईल, दुसरें, 'ळ' आणि 'र' ह्यांस दीर्घत्व न येतां केवळ चा, ची, चें, हे

[illegible] व तीनच शब्द असे आहेत; म्हणून प्रत्यय लागून झालेल्या साधित अकारान्त शब्दांचा अन्त कोणत्याही प्रकारें दीर्घ न झाल्यास मूळच्या उपान्त्य अक्षराचे इकार व उकार दीर्घच राहतात; जसें—धीट—धीटपणा; जामीन—जामीनकी; ताबूस—ताबूसपणा; परंतु धीट—धिटाई, जरूर—जरुरी, इ०.

१०. अन्त्य व उपान्त्य ह्यांखेरीज मागच्या अक्षरांचे इकार व उकार ह्रस्व असतात; जसें—जिनका, विचारणें, तुरट, पुरवठा, विकलें, चिंचोका, फुकणी, चिचवणी. इ०.

टीप—निजणें, चिरलें, विकतो इत्यादि क्रियापदांचीं आज्ञार्थी नीज, चीर, वीक इ० रूपें होतात व तेव्हां त्यांस वरील ६ वा नियम लागू पडतो.

११. संस्कृतभाषेंतील शब्द शिवायकरून इतर भाषांतील शब्द बहुधा ह्या वरील ह्रस्वदीर्घांच्या नियमांस अनुसरतात; जसें—वकील, चिटणीस, हकूम [नि० ६]; जाहीर खबर, (नि० ९); जाहिरात [नि० १०], अदबी (नि० ८); इ०.

अपवाद—बिन, दिल, खुष, बगीचा, मूका इ०.

सूचना-हे वरील ह्रस्वदीर्घाविषयींचे नियम कवितेत गण, मात्रा, प्रास व यमकें यासंबंधानें कोठें कोठें लागत नाहींत व मूळ शब्दांतही पुष्कळ फेरफार होतात; जसें—

(१) ये रथावरि० (= वर)

(२) खड्ग देइन० (=देईन)

(३) तोडि मस्तक० (=तोड)

(४) क्रीडा निथें० (=तेथें)

(५) पाहे जणों मारिल (=मारील)

(६) त्वां काय कर्म करिजे (=करावें)

(७) शत्रुघ्न ते भरत बांधिति (बांधतात, बांधिते झाले)

(८) एक जाउनी सांगती सितेे (=जाऊन सांगतात—सीतेला)

(९) आला त्वरेंकरूनि (=करून)० आश्रमाशी (=आश्रमास)

(१०) पाहे हयासि लव निर्भयतें (तें?) करोनी (=निर्भयतें करून)

(११) वंदन करोनियां (=करून) राजा द्रोणासि म्हणे

(१२) अश्व कंठिची (=अश्वकंठची—कंठाची.) सुवर्णमाळ

(१३) येऊनी लहु तो निवेदुनि नमी (=येऊन निवेदून नमला) इ०.

प्रकरण दुसरें—भाग दुसरा.

मराठी भाषेंत येणाऱ्या संस्कृत शब्दांच्या इ, उ, ऋ व ऌ ह्या वर्णांच्या ऱ्हस्वदीर्घांविषयीं.

१. धातूस ति किंवा इ हे प्रत्यय लागून झालेल्या व इतर सिद्ध[1] स्त्रीलिंगी नामांच्या अन्त्याक्षराचा इकार ऱ्हस्व असतो; जसें—शक्ति, स्थिति, कृति, प्रकृति, बुद्धि, रूढि, रात्रि, पंक्ति, भूमि, रुचि, जाति, रति, मूर्ति, तिथि, अतिथि, विश्रांति, भक्ति, विभक्ति, भीति, स्मृति, शुद्धि, प्राप्ति, कांति, इ०.

अपवाद—लक्ष्मी, रजनी, वाणी, प्राची; धी, श्री, स्त्री; इ०.

२. पुल्लिंगी व नपुंसकलिंगी नामें आणि विशेषणें यांवरून साधित स्त्रीलिंगी शब्दांच्या अन्त्याक्षराचा इकार दीर्घ असतो; जसें—दासी, कुमारी, नदी, सखी, देवी, नारी, पार्वती, गौरी, जानकी, करिणी, (हत्तीण), पद्मिनी, कमलिनी, सौभाग्यवती, बुद्धिमती, विदुषी, चतुर्थी, पंचमी, षष्ठी, सप्तमी—दशमी, एकादशी—चतुर्दशी, पृथ्वी, लघ्वी, सती, साध्वी इ०.

३. स्त्रीलिंगी उकारान्त शब्द बहुधा ऱ्हस्व असतात; जसें—धेनु, तनु, रज्जु, चंचु; इ०.

अपवाद—वधू, श्वश्रू [सासू], चमू, भ्रू (भुंवई), पुनर्भू (पुनर्विवाहित स्त्री), वामोरू (सुंदर स्त्री).

[1] सिद्ध म्हणजे केवळ प्रत्यय लागून झालेले धातुसाधित शब्दसाधित नव्हेत.

४ पुल्लिंगी आणि नपुंसकलिंगी शब्दांच्या अन्त्याक्षराचे इकार व उकार बहुतकरून ऱ्हस्व असतात; जसें—हरि, रवि, कवि, अग्नि, ऋषि, राशि, अंजलि, दधि, अस्थि, वारि, इ० इकारान्त; गुरु, भानु, बाहु, बंधु, वायु, ऋतु, रिपु, शत्रु, मधु, अश्रु, वस्तु, साधु, इच्छु, मुमुक्षु, सहिष्णु, कृपालु, लघु, मृदु, बहु, इ० उकारान्त.

अपवाद—'धी' व 'भू' हीं अक्षरें ज्या शब्दांच्या अन्तीं असतात ते शब्द जसें—स्वयंभू, वर्षाभू (बेडूक); सुधी, प्रधी, इ०

सूचना—'अश्रु' व 'वस्तु' हे शब्द नपुंसकलिंगी असून मराठींत ह्यांस अनुक्रमें पुल्लिंगी व स्त्रीलिंगी मानितात.

टीप—दीर्घ इकारान्त व दीर्घ उकारान्त नपुंसकलिंगी शब्द संस्कृत भाषेंत नाहींत.

५ हलन्त (म्हणजे ज्यांच्या शेवटीं व्यंजन असतें ते) पुल्लिंगी व नपुंसकलिंगी शब्दांच्या अन्त्य व्यंजनाचा लोप होतो नपुंसकलिंगी शब्द ऱ्हस्वान्त असतात; जसें—चंद्रमा (चंद्रमस्) आत्मा (आत्मन्), पय (पयस्), जग (जगत्), धनु (धनुस्) चर्म (चर्मन्), हवि (हविस्); इ.

६ स्वामित्वसूचक (म्हणजे तो, ती, किंवा तें आहे ज्यास असा अर्थाचा) इ (इन्) हा प्रत्यय लागून झालेल्या पुल्लिंगी साधित शब्दाचा तो अन्त्य इकार दीर्घ असतो जसें—गुण—गुणी, कोप—कोपी, शिखा—शिखी शास्त्र—शास्त्री, शृंग—शृंगी; इ०.

टीप—ह्या शब्दांचीं हीं संस्कृत भाषेंत प्रथमेच्या एकवचनाचीं अशीं दीर्घान्त रूपें आहेत, म्हणून मराठींत हे शब्द प्रथमेच्या उभयवचनीं दीर्घान्तच लिहावे; परंतु हे शब्द समासामध्यें सामासिक शब्दाच्या अन्तीं नसल्यास ऱ्हस्व होतात; जसें—प्राणिमात्र, हस्तिदंत, इ०.

७. साधित व सामासिक शब्दांमधील सिद्ध व पूर्व शब्दाचे मूळचे अन्त्य इकार व उकार ह्रस्व असतात ते (सवर्ण संधींतील वेगळे करून) ह्रस्व राहतात, व दीर्घ असतात ते दीर्घ राहतात; जसें—याग्नि—नी, धनि—क, हरि—जागर, शत्रु—त्व, गुरु—सेवा, पत्नी—त्व, भागीरथी—स्नान, भू—गोल; इ०. सवर्ण संधींतील उदाहरणें:—हरि+इच्छा=हरीच्छा, गुरु+उपदेश=गुरूपदेश; इ०.

८. ऋकारान्त शब्दाचा ऋकार मराठी भाषेंत कायम राहत नाहीं; जसें—दातृ—दाता (एकवचन) दाते (बहुवचन), भ्रातृ—भ्राता (ए० व०) भ्राते (ब० व०); इ०.

टीप—दाता, भ्राता इ० हीं संस्कृत भाषेंत दातृ, भ्रातृ इ० ह्या शब्दांच्या एकवचनाचीं रूपें आहेत.

९. साधित शब्दांतील सिद्ध शब्दाचा व सामासिक शब्दांतील पूर्वशब्दाचा मूळचा अन्त्य ऋकार, व सिद्ध शब्दांतील उपान्त्याक्षराचा ऋकार हे मराठींत नेहमीं ह्रस्वच असतात; जसें—कर्तृ—त्व; पितृ—भक्ति, मातृ—वात्सल्य; स्मृति, तृण; इ०.

टीप—सवर्ण संधींत मात्र ऋकार दीर्घ येतो; जसें—पितृ + ऋण = पितॄण.

१०. दीर्घ ॠकारान्त शब्द व ऌकारान्त शब्द हे फारसे संस्कृत भाषेंतच प्रचारांत येत नाहीत; मग मराठींत कोठून येणार? उपान्त्याक्षराचा ऌकार ह्रस्व असतो; जसें—कॢप्ति.

११. शब्दांस विभक्तिप्रत्यय अथवा शब्दयोगी अव्यये जोडिलें असतां त्यांचे मूळचे अन्त्य इकार व उकार ह्रस्व असल्यास दीर्घ होतात व दीर्घ असल्यास दीर्घच राहतात; जसें—कीर्ति—कीर्तीस, साधु—साधूस; नदी—नदीचा, वधू—वधूचा; इ०.

१२. धातूस 'इत' हा प्रत्यय लागून झालेल्या भूतकालवाचक धातुसाधित विशेषणांच्या उपान्त्याक्षराचा इकार ह्रस्व असतो; जसें—पतित, दूषित, मिश्रित, इ०.

अपवाद—गृहीत.

१३. इक, उक, इर, उर, इल, इत्र, त्रिम, इष्ठ, इत्यादि प्रत्यय लागून झालेल्या शब्दांच्या उपान्त्याक्षराचे इकार व उकार ह्रस्व असतात; जसें—रसिक, पथिक, कायिक, वाचिक, मानसिक; सांवत्सरिक; घातुक; रुचिर, बधिर; क्षणभंगुर, चतुर; कुटिल; पवित्र, चरित्र; कृत्रिम; वरिष्ठ, कनिष्ठ; इ०.

१४. ईय, अनीय, व ईन हे प्रत्यय लागून झालेल्या विशेषणांच्या उपान्त्याक्षराचा इकार दीर्घ असतो; जसें—स्वकीय, परकीय, सजातीय, विजातीय; रमणीय, विश्वसनीय, वर्णनीय; कुलीन, नवीन, प्राचीन, अर्वाचीन (उदासीन) इ०.

१५. अन्त्याक्षरावर रेफ असल्यास उपान्त्य अक्षराचे इकार व उकार दीर्घ असतात; जसें—दीर्घ, मूर्ख, जीर्ण, पूर्ण, सूर्य, ऊर्ध्व, पूर्व, दूर्वा, मूर्च्छा; इ०.

अपवाद—चातुर्य, माधुर्य, उर्वी, गुर्वी, इ० हे शब्द चतुर, मधुर, उरु, गुरु. ह्या शब्दापासून निघाले आहेत म्हणून मूळचा ह्रस्व उकार कायम राहिला; तसेच दुर्–दुर्गम, निर्–निर्दय; इ०.

१६. धातूस त किंवा इत हा प्रत्यय लागून झालेल्या भूत· कालवाचक साधित विशेषणांचे मूळच्या धातूचे फक्त इकार व उकार (अन्त्य व उपान्त्य) ह्रस्व असतात ते ह्रस्व राह· तात व दीर्घ असतात ते दीर्घ राहतात; जसें – श्रि–आश्रित, स्तु – प्रस्तुत; नी – नवनीत, पू – पूत; दिश् – आदिष्ट; पुष् – पुष्ट; पीड् – पीडित; भूष् – भूषित; इ०.

(ह्या 'त' प्रत्ययाची पर्यवसित कधीं कधीं, ढ, ण, ध, न इ० हीं अक्षरें होतात; जसें – सह – सोढ; ऋ – ऋण, स्तृ – विस्तीर्ण; क्रुध् – क्रुद्ध, नह् – नद्ध; ली – लीन, इ०.)

अपवाद – 'ट' आणि 'ण' हीं अक्षरे ज्यांच्या शेवटीं येतात ते शब्द; जसें – लिह् – लीढ, मुह् – मूढ, क्षि – क्षीण; इ०.

• धा–धा, स्था आणि गै ह्या धातूंपासून अनुक्रमें झालेल्या हित, स्थित, व गीत ह्या धातुसाधित शब्दांच्या उपान्त्याक्षराचे ह्रस्व व दीर्घ इकार ध्यानांत ठेवण्यासारिखे आहेत.

१७ धातूस संप्रसारण झालें असतां म्हणजे य, व, र, ल ह्यांच्या जागीं इ, उ, ऋ, ऌ हे वर्ण आले असतां ते इकार, उकार, ऋकार व ऌकार ह्रस्व असतात; जसें – यज् – इष्ट, स्वप् – सुप्त, वच् – उक्त, वद् – उदित, प्रच्छ् – पृष्ट.

अपवाद – वह् – ऊढ इ०.

१८. धातूंस इतर प्रत्यय लागून झालेल्या शब्दांमें मूळचे धातूचे फक्त इकार व उकार (अन्त्य व उपान्त्य) ह्रस्व असतात ते ह्रस्व राहतात, व दीर्घ असतात ते दीर्घ राहतात; जसें – जि – जिष्णु; यु – युति (चंद्र वगैरेचा इतर ग्रह किंवा नक्षत्र यांशीं योग); प्री – प्रीति; भू – विभूति; इष् – इच्छा; मुच् – मुक्ति; क्रीड् – क्रीडा; पूज् – पूजन; इ०.

१९. उपसर्ग व अव्ययें ह्यांचे अन्त्य आणि उपान्त्य इकार व उकार हे बहुधा ह्रस्व आहेत ते धातु वगैरेशीं युक्त झाले असता (सवर्ण संधींतील शिवायकरून) ह्रस्व च राहतात. जसें – अनु – अनुबंध, निस् – निःसंशय. निर् – निर्णय, निरभ्र, दुस् – दुष्परिहार्य, दुर् – दुर्बोध, वि – विधवा – विनाश, नि – नियम, अधि – अधिकार, अभि – अभिधान, अति – अतिशयित सु – सुवर्ण, कु – कुग्राम, उत् – उत्कृष्ट, अभि – अभिमान, प्रति – प्रतिनिधि, परि – परिणाम, उप – उपनेत्र; तिरः – तिरस्कार, उच्चैः – उच्चैःश्रवा, आविः – आविर्भूत, आशु – आशुग, इति – इतिहास, इत्थं – इत्थंभूत, धिक् – धिक्कार, चिर – चिरकाल, चिर – चिरंजीव, पुनर् – पुनर्विवाह, दिवा – दिवाभीत, पुरः – पुरस्कर्त्ता, पुरा – पुरातन, प्रादुः – प्रादुर्भूत, बहिः – बहिष्कार मिथ्या – मिथ्यावाद, (पृथक् – पृथक्करण); (परि + ईक्षा = परीक्षा).

टीप – कांहीं उपसर्गाच्या इकारास विशेषस्थळीं संस्कृत भाषेंत दीर्घत्व विकल्पेंकरून येतें; जसें – प्रतिकार, प्रतीकार; अतिसार, अतीसार इ०. व कांहीं ठिकाणीं इकार नेहमीं दीर्घ होतात; जसें – नीवार, (धान्य), नीरस (रसहीन).

२०. कृ आणि भू ह्या धातूंपासून निघालेल्या शब्दांपूर्वी समासामध्यें जे दुसरे शब्द येतात त्यांच्या अन्तीं अकार, किंवा इकार असला तर त्यांचा ईकार होतो आणि उकार असला तर ऊकार होतो; जसें – पुत्रीकृत, स्व – स्वीकार, सम—समीकरण, भस्म (न्) – भस्मीभूत, वक्र – वक्रीभवन, अव्यय – अव्ययीभाव; शुचि—शुचीभूत, पटु—पटूभवन इ०.

२२. कर्तरि व कर्मणि हीं कर्तृ व कर्मन् ह्या शब्दाचीं सप्तमीचीं अशीं ह्रस्वान्त रूपें आहेत, म्हणून मराठींत तीं तशींच लिहावीं, त्याचप्रमाणें भावे हें भाव ह्या शब्दाचें सप्तमीचें रूप आहे, परंतु प्रचारांत भावी असें विशेषण समजून दीर्घान्त लिहितात.

२३. अन्त्य अक्षराशिवाय मागील कोणत्याही अक्षरावर अनुस्वार अथवा अनुनासिक असल्यास त्या अक्षराचा जो इकार, उकार अथवा ऋकार असेल तो ह्रस्व लिहावा; जसें:—

सिंह इंद्र सिंधु चिंता निंदा लिंग इंदु अरविंद गोविंद सिंदूर इंद्रिय इंधन किंकर पिंड सिंचन हिंसा रुंड कुंभ कुंकुम चुंबन कुंजवन पुंडलीक गुंजा शृंग शृंखला वृंद (समूह) वृंदावन वृंदारक (देव) जृंभा भृंगतती उंदुरु (उंदीर) तुंड (तोंड) इ०. इ०. इ०. इ०. इ०. इ०. इ०. इ०.

२४. कांहीं शब्द अर्थभेदेंकरून ह्रस्व दीर्घ लिहावे लागतात; जसें –

कुल (गोत्र)–कूल (तीर);	इति (समाप्तिसूचक अव्यय),
सुत (मुलगा)–सूत (सारथी);	ईति (घोरपड, ईश्वरी क्षोभ),
द्विप (हत्ती)–द्वीप (बेट);	सुकर (सुलभ)
शुक (पोपट)–शूक (कुसळ);	सूकर (डुक्कर)
अलिक (कपाळ)	अलीक (खोटें)
इ०	इ०

२५. (क) पुढील शब्दांच्या उपान्त्याक्षराचे इकार व उकार हे ह्रस्व आहेत.—

शिव	चित्र	मित्र	रिपु	द्विगु
प्रिय	छिद्र	इक्षु	सचिव	दक्षिण
पश्चिम	आश्विन	कार्तिक	वृश्चिक	धनिष्ठा
मलिन	गिरी	कारिका	चरित्र	हरिण
सरित्	तडित्	रुधिर	रोहिणी	परिघ
इ०	इ०	इ०	इ०	इ०

सुर	क्षुद्र	बुध	शुक्र	अद्भुत	करुणा
असुर	कौतुक	वरुण	फाल्गुन	मिथुन	तत्पुरुष
पुण्य	निपुण	कौस्तुभ	कौमुदी	कंचुक	बकुल
मुकुट	द्रुम	अर्जुन	मुख	सुख	दुःख
इ०	इ०	इ०	इ०	इ०	इ०

(ख) पुढील शब्दांच्या उपान्त्याक्षराचे इकार व उकार हे दीर्घ लिहावे:–

वीणा टीका सीता पीठ बीज कीट क्षीर तीर
नीर कौपीन शरीर जंबीर वीर धीर तीक्ष्ण गंभीर
मीन प्रवीण द्वितीय तृतीय विपरीत तूणीर हीन बहुव्रीहि
इ०. इ०. इ०. इ०. इ०. इ०. इ०. इ०
कूप धूप मूल शूर दूर क्रूर यूथ सूत शूद्र
शून्य मूल्य सूक्ष्म स्थूल त्रिशूल गोधूम तांबूल अनुकूल प्रति.
इ०. इ०. इ०. इ०. इ०. इ०. इ०. इ०. इ०.

(ग) पुढील शब्दांच्या अन्त्य व उपान्त्य ह्यांखेरीज मागच्या अक्षरांचे इकार व उकार ह्रस्व आहेत.

किरण दिवस विषुववृत्त दिवौकस् विवर विहग पिशाच
इ०. इ०. इ०. इ०. इ०. इ०. इ०.
उत्तर कुसुम सुमन कुबेर तुमुल उदक पुस्तक
इ०. इ०. इ०. इ०. इ०. इ०. इ०.

(घ) पुढील शब्दांच्या अन्त्य व उपान्त्य ह्यांखेरीज मागच्या अक्षरांचे इकार व उकार दीर्घ लिहावे.

ईश्वर ईशान्य बिभीषण भगीरथ पीवर
सीत्कार हृषीकेश नीरस कीचक धीवर
इ०. इ०. इ०. इ०. इ०.
मूषक सूचना कुतूहल विदूषक मधुसूदन
नूतन धूर्जटि केयूरक उलूखल धूसर नूपुर
इ०. इ०. इ०. इ०. इ०. इ०.

प्रकरण तिसरें.

विरामचिह्नांविषयीं.

आपण जें कांहीं लिहितों, तें वाचतांना त्याचा अर्थ दुस-ऱ्यास स्पष्ट समजण्याकरितां जागजागीं थांबावें लागतें, म्हणून कोठें किती वेळ थांबावयाचें हें जाणविण्याकरितां लिहितांना जीं चिह्नें केलीं पाहिजेत, त्या चिह्नांस विरामचिह्नें म्हणतात. तीं एकंदर अकरा आहेत; त्यांचीं नावें व खुणा येणेंप्रमाणें: स्वल्पविराम (,), अर्धविराम (;), अपूर्णविराम (:), पूर्णविराम (.), प्रश्नचिह्न (?), उद्गारचिह्न (!), अवतरणचिह्न (" ") (' '), कौंस ( ), संयोगीचिह्न(–), संक्षेपकचिह्न (०), आणि काकपद (^).

१. (अ) एकाच लांब वाक्यांत दुसरीं एकमेकांशीं संबंध ठेवणारीं लहान लहान वाक्यें, किंवा ओळीनें एकाच विभक्तींत दोहोंपेक्षां अधिक कांहीं शब्द आले असतां, त्या प्रत्येकापुढें स्वल्पविरामचिह्न करावें; जसें—विष्णूनें स्नान केलें, संध्या केली, आणि जेवण झाल्यावर अंगरखा, टोपी, व जोडा घालून तो शाळेस गेला.

टीप–ह्या पैकीं शेवटल्या शब्दापुढें विरामचिन्ह नको.

(ब.) मोठ्या वाक्यांत उभयान्वयी अव्ययापूर्वीं बहुधा स्वल्पविरामचिह्न येतें, परतु ' कीं ' ह्या उभयान्वयी अव्ययाच्या-पुढें स्वल्पविरामचिह्न देतात.

(क.) संबोधनापुढें स्वल्पविरामचिह्न द्यावें, जसें – हे ईश्वरा, दयाकर.

२. जेव्हां एका लांब वाक्यांत कांहीं अंशीं स्वतंत्र वाक्यें येतात, परंतु अर्थाची पूर्ण समाप्ति होत नाहीं, तेव्हां त्या प्रत्येक वाक्यापुढें स्वल्पविरामचिह्न करून, त्यांतील शेवटल्या वाक्यापुढें अर्धविरामचिह्न करावें; जसें गोविंदा आला, बसला, व गेला; पण तो कांहीं बोलला नाहीं.

३. एका वाक्यांतील जो अर्थ त्याचेंच दुसऱ्या वाक्यानें उपपादन करावयाचें असल्यास, दुसऱ्या वाक्यापूर्वीं अपूर्ण विरामचिह्न करावें; जसें—विद्या ही संपत्तीपेक्षां अधिक योग्यतेची आहे, व एक कवि असेंच ह्मणतो: ' धनाहुनि श्रेष्ठ विद्या, नसे उणी; ' इ०.

टीप–कोणी अपूर्ण विरामापुढें लांबट संयोगीचिन्ह करितात जसें(:–)

४. जेथें अर्थाची पूर्णरीतीनें समाप्ति होते तेथें पूर्णविरामचिह्न करावें.

५. ज्या वाक्यांत प्रश्न येईल त्याच्या शेवटीं प्रश्नचिह्न द्यावें, परंतु क्रमानें पुष्कळ अशींच वाक्यें आल्यास प्रत्येकापुढें स्वल्पविरामचिह्न अगर अर्धविरामचिह्न देऊन शेवटल्या वाक्यापुढें प्रश्नचिह्न करावें; जसें – आपण केव्हां आलां? तुह्मी कोठें राहतां, आपलें नाव काय, धंदा कोणता?

टीप–इंग्रजी भाषेच्या धरतीप्रमाणें कोणी प्रश्नरूपी वाक्य एकाद्या क्रियापदाचें कर्म असल्यास त्याच्या शेवटीं प्रश्नचिन्ह देत नाहीं; जसें–तो कोण आहे हें मला माहीत नाहीं.

६. ज्या शब्दांनीं अथवा वाक्यांनीं मनोविकार दाखविले जातात त्यांपुढें उद्गारचिह्न करावें; जसें – अहहा ! अरे, दुष्टा ! काय चमत्कार आहे!

७. जेव्हां दुसऱ्याचें बोलणें अक्षरशः लिहावयाचें असतें तेव्हां तें सर्व अवतरणचिह्नांमध्यें लिहावें; जसें – "जैसा बोले तैसा चाले, त्याचीं वंदावीं पाउलें"—तुकाराम; 'मना वासना दुष्ट कामा नये रे'—रामदास.

८. जेव्हां एका वाक्यांत एखाद्या शब्दाचें स्पष्टीकरण करावयाचें असतें, पण त्या स्पष्टीकरणाचा मुख्य वाक्याशीं फारसा संबंध नसतो, तेव्हां तसलें स्पष्टीकरण कौंसांत लिहावें; जसें – सविभक्तिक शब्द [ज्यांस लिंगादि कार्यें होतात ते] चार प्रकारचे आहेत.

९. (क) एका शब्दाचीं सर्व अक्षरें ओळीच्या अन्तीं न संपलीं तर त्या अर्धवट शब्दापुढें संयोगीचिह्न करावें, व बाकीचीं अक्षरें दुसऱ्या ओळींत लिहावीं; जसें—तो मनुष्य मेह-नती आहे.

(ख) सामासिक शब्द एकमेकांस जोडून लिहावे, व एका ओळीच्या अन्तीं सर्व सामासिक शब्द न संपल्यास त्या तुटक शब्दापुढें संयोगीचिह्न करावें; जसें—पूर्वी रुद्रललाट-लोचनशिखिज्वालामुखीं जो जळे.

(ग) सर्व प्रकारचीं शब्दयोगीअव्ययें शब्दांस जोडून लिहावीं, जसें – त्याचप्रमाणें; व ओळीच्या अन्तीं जोडण्यास

सवड नसल्यास सामान्यरूपापुढें संयोगीचिह्न करून, अव्यय दुसऱ्या ओळींत लिहावें; जसें--ह्या जगतीतलामध्यें कनका-सारखें व कामिनीसारखें दुसरें मोहक नाहीं.

(घ) एखाद्या विषयाच्या संबंधानें उदाहरण देणें असल्यास त्याच्या पूर्वीं आणि एका वस्तूचा दुसऱ्या वस्तूशीं संबंध दाखविणें असल्यास दोहोंच्यामध्यें संयोगीचिह्न लांबट करावें; जसें–प्रकरण दुसरें–भाग पहिला.

१०. एक शब्द किंवा एक वाक्य सगळें लिहावयाचें नसल्यास संक्षेपचिह्न करावें; जसें – इ० स० (इसवी सन), ' भीष्माकडे रव० ' ही कविता म्हणा.

११. लिहितांना एखादा शब्द चुकून एखाद्या जागीं लिहावयाचा राहिल्यास खालीं काकपद करून ओळीच्यावर अगर बाजूला तो शब्द लिहावा.

१२. विषयाचा भाग संपला म्हणजे पारिग्राफ करावा.

प्रकरण चवथें.

किरकोळ गोष्टींविषयीं.

१. ल् आणि ळ् ह्या व्यंजनांस पुढें कोणतेंही अक्षर जोडिलें असतां, त्या व्यंजनांतील उभी रेघ देऊं नये; जसें —

कलपना (अशुद्ध) कल्पना (शुद्ध)
निळया (अशुद्ध) निळ्या (शुद्ध)

२. संस्कृत भाषेंत हकारांशीं संयुक्त झालेल्या न्, म्, य्, व्, र, ल्. ह्या वर्णांमध्यें हकाराचा अगोदर उच्चार होतो म्हणून हकार पूर्वीं काढून हीं व्यंजनें खालीं किंवा पुढें जोडावीं; जसें चिह्न, ब्रह्म, गुह्य, विह्वल, ह्रस्व, प्रह्लाद इत्यादि शब्दांत न्ह, म्ह, य्ह, व्ह, र्ह, ल्ह अशीं अक्षरें लिहूं नये.

परंतु मराठी भाषेंत ही रीत अगदीं उलट आहे, म्हणजे हकार मागून लिहितात; जसें — न्हावी, म्हणणें, नव्हे, कुऱ्हाड, जिल्हा, इ०.

अपवाद — हकाराचा आणि यकाराचा संयोग असल्यास हकार अगोदर लिहावा; जसें — ह्याचा, रोह्यांस (रोहें हें कुलाबा जिल्ह्यांत एक गांव आहे.), इ०.

३. कोणत्याही अक्षराला रकार पूर्वी जोडणें असल्यास त्याचा रेफ होतो; – जसें – धूर्त, वीर्य; इ०.

अपवाद – मोहऱ्या (मोहर्या नव्हे) दोऱ्या इ० अन्त्याक्षरीं रकार असणारे शब्द.

छ्, ट्, ठ्, ड्, ढ् आणि ह् ह्या व्यंजनांस रकार मागून जोडणें झाल्यास (^) अशी खूण करितात, जसें—छ्र्लोक, राष्ट्र, ठ्रान्त, त्रिपुंड्र, ढ्रलोप, ह्रस्व; इ०.

४. बुद्धि, समृद्धि इत्यादि शब्दांमध्यें दकाराचा अगोदर उच्चार होऊन मग धकाराचा उच्चार होतो, सबब ह्या शब्दांत त् ला ध् जोडून (त्ध), किंवा द्वित्व ध् करून (ध्ध) लिहिणें अशुद्ध होईल; तेव्हां बुध्धि, समृध्धि अशा तऱ्हेनें हे शब्द न लिहितां आरंभीं लिहिल्याप्रमाणें लिहावे.

५. राजा ह्या शब्दाचें सामान्यरूप जकारसहित यकारान्त करूं नये, म्हणजे ह्या शब्दाचा व राज्य ह्या शब्दाचा घोंधळ होणार नाहीं; जसें—राजा – राजास, राजाला; राज्य—राज्यास.

६. ' स ' आणि ' श ' हीं अक्षरें ज्या शब्दांमध्यें येतात त्यांचें कांहीं रूपान्तर झालें तर सचा श होतो, जसें—पोसणें पोशिलें इ०; परंतु शेवटीं असल्यास त्याचें सामान्यरूप शकारासहित यकारान्त करूं नये, परंतु नुस्तें शकारान्तच करावें; जसें – असें – अशासाठीं, जोशी – जोशास; इ०.

७. हा. ही, हें, हे, ह्या, हीं; ह्या दर्शकसर्वनामांचें सामान्यरूप करितांना हकार कायम ठेवावा; जसें—ह्यास, हिला, ह्याचा ह्यांना; इ०.

तसेंच हा व तो ह्या सर्वनामांसही तृतीयेचे 'ने' व 'नी' हे प्रत्यय लाविले असतां, णत्व करून ह्याणें त्यांणीं, अशीं रूपें न लिहितां, ह्यानें, त्यांनीं अशीं रूपें लिहावीं.

८. एथें, एथून, एवढा, एवढी इत्यादि शब्द 'इदम्' ह्या सर्वनामापासून निघालेले आहेत म्हणून येथें, येथून, येवढा, इ० अशीं रूपें लिहूं नयेत; कारण तीं यद् ह्या सर्वनामापासून निघालेलीं नाहींत: यद् ह्या सर्वनामांपासून निघालेले शब्द जेथें, जेथून, जेवढी इत्यादि आहेत.

९. पाहणें, राहणें, वाहणें इत्यादि हकारान्त धातूंपासून निघालेल्या शब्दांत हकार पुढें एकादें दीर्घ अक्षर असलें तर हच कायम राहतो: जसें – पाहतो, पाहतात, पाहणें; इ०

अपवाद—पहावें

परंतु हकारापुढें अक्षर नसलें किंवा ह्रस्व असलें, तर मात्र पाहिल्या अक्षराचा काना हळू जातो; जसें – (तूं) पहा, (तो) पहात नाहीं; इ०.

इतर ठिकाणीं जात नाहीं; जसें – पाहून, राहिले, वाहील; इ०

१० धांवणें, ठेवणें इत्यादि धातुसाधित नामांचीं जेव्हां निमित्तकालवाचक व पूर्वकालवाचक धातुसाधितें होतात तेव्हां ह्यांतील वकार कायम ठेवावा; जसें – ठेवून, इ०.

तसच जाणें, येणें, इत्यादिकांच्या धातुसाधितांत वकार लिहूं नये; जसें – जाणें–जाऊं, जाऊन इ०.

११. आलीकडे व पलीकडे ह्या शब्दांत मूळशब्द अर्वाक् आणि पर हे असून रूपांतर झाल्यावर त्यांस ' कडे ' हें शब्दयोगी जोडिलें आहे, म्हणून ' कोणीकडे चोहींकडे ' इ० शब्दांप्रमाणें त्याचा सामान्यरूपाचा इकार दीर्घ लिहावा; (हे शब्द ऐल व पैल ह्या शब्दांपासून निघाले आहेत असेंही म्हणतात, तेव्हां, मग अलीकडे पलीकडे अशीं त्यांचीं रूपें होतील.)

परंतु ही, ती, व जी, ह्या सर्वनामांस ' कडे ' हें अव्यय जोडून झालेल्या क्रियाविशेषण अव्ययांतील सामान्यरूपाचा इकार ह्रस्व होतो. [प्रकरण २रें–भाग पहिला, नियम २ रा व ३ रा पहा]

१२ कांहीं शब्द अर्थभेदेंकरून भिन्न रीतीनें लिहावे लागतात; जसें–

भट (योद्धा)	भट्ट (भिक्षुक)
ग्रह (तारा)	गृह (घर)
मत (अभिप्राय)	मत्त (माजलेला)
विषयी (विशेषण)	विषयीं (अव्यय)
समई (दीपपात्र)	समयीं (वेळेस)
कर्ण (कान)	करण (क्रियेचें साधन)
वर्ण (रंग, जाति)	वरण (जेवणांतील)
इ०	इ०

१३ कांहीं शब्दांचे उच्चार चुकीचे असल्य
शब्द लिहितांना चुका होतात म्हणून त्यांचे शुद्ध
खालीं लिहिल्याप्रमाणें समजावे.

अशुद्ध.	शुद्ध.	अशुद्ध.	शुद्ध.
माहाराज	महाराज	येक	[illegible]
माहादेव	महादेव	च्यार	चार (४)
लक्षमण	लक्ष्मण	श्राप	शाप
लक्षुमी	लक्ष्मी	द्रुष्ट	दुष्ट
सिंव्ह	सिंह	क्रुपा	कृपा
अरंण्य	अरण्य	दर्बार	दरबार
व्याकर्ण	व्याकरण	सर्कार	सरकार
प्रकर्ण	प्रकरण	अन्भव	अनुभव
कर्मधार्य	कर्मधारय	क्रद्ध	क्रुद्ध
इ०.	इ०.	इ०.	इ०

समाप्त.

समाप्त.